सकाळ






# हॅप्पी पेरेंटिग : मुलांना विचार करायला शिकवू!

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (15 July 2023)

सगळ्याच पालकांना आपली मुलं सहज वाढावीत असं वाटत असतं. मुलांनी संघर्ष करू नये, त्यांच्या वाटेला अडथळे, समस्या येऊ नयेत हीसुद्धा इच्छा असते. त्यातून प्रेमळ पालक मुलांच्या वाटेतल्या छोट्या मोठ्या समस्या त्यांना जाणवायच्या आधीच सोडवत असतात. किंवा एखादा प्रश्न घेऊन मूल पालकांकडे आलं, तर त्याक्षणी त्या प्रश्नाचं उत्तर देऊन मोकळे होतात. यातून एक नवीनच प्रश्न निर्माण होतो - 'मुलं स्वतः विचार करायला शिकणार कधी?'

समोर असलेल्या प्रश्नावर, हातात असलेली माहिती लक्षात घेऊन तार्किक विचार करून उत्तरं शोधणं म्हणजे 'क्रिटिकल विचारसरणी!' दुर्दैवानं सध्याची मुलं हेच करायला कमी पडतात. इंटरनेटच्या माध्यमातून भरपूर माहिती एका बटणाच्या क्लिकवर मिळते; पण त्यावर विचार करून निर्णय मात्र घेता येत नाही.

अगदी साध्या सोप्या अडचणीवरही मुलं, विशेषतः किशोरवयीन मुलं, भांबावून जातात किंवा 'गुगल' करतात; पण संशोधनातून हे सिद्ध झालंय, की योग्य प्रमाणात संघर्ष प्रत्यक्षात सखोल शिक्षणाकडे नेतो. आपण मुलांना 'विचार करायला' कसं शिकवू शकतो?

## मदत करण्याची घाई नको

आपल्या मुलांनी शाळेच्या अभ्यासात, प्रकल्पात मदत मागितली, तर थोडे थांबा. डॉ. स्टेफनी कोर्ड म्हणतात, 'मुलांच्या समस्या सोडवताना, एक पाऊल मागे घ्या, वेळ पडल्यास एखादा सोपा संकेत (Hint) द्या; पण मुलांना त्यांची समस्या स्वतः सोडवू द्या.'

## स्वतःच्या चुका स्वतः शोधू द्या

मुलांच्या चुका होणारच; पण त्यांना स्वतःच्या चुका स्वतः शोधू द्या. मुलं अभ्यास करताना आपण शेजारी बसून सारखं लक्ष ठेवून चूक होतानाच त्यांना अडवतो. मुलांना 'आपल्या चुका दुरुस्त करायला पालक बसलेच आहेत' असा समज होतो. त्याउलट त्यांना त्यांचा गृहपाठ स्वतः परत 'चेक' करून चुका शोधून दुरुस्त करायची सवय लावा! मुलांनी चूक शोधून दुरुस्त केली, तर नक्की कौतुक करा.

## थांबा - ऐका- प्रश्न विचारा

मुलं समस्या घेऊन आली, तर लगेच उत्तर न देता त्यांचं ऐका. त्यातून उत्तराकडे नेणारे छोटे छोटे प्रश्न विचारा. त्यातून मिळणाऱ्या उत्तरांच्या साखळीतून मुलांना निर्णयाप्रत पोचायला मदत करा. मुलांना एकदा का याची सवय लागली, तर लगेच स्वतःची उत्तरं स्वतः शोधू लागतील.

## विचार करायला लावणारी आव्हानं द्या

ज्याप्रमाणे आपले स्नायू हलके वजन उचलून वाढत नाहीत, त्याचप्रमाणे मेंदूला आव्हान दिल्याशिवाय मेंदू विकसित होणार नाही. बौद्धिक आव्हानं आवश्यकच.

पालक मित्रांनो, आपण मुलांना 'कसा विचार करायचा?' हे शिकवू यात. हे 'विचार करण्याचं शस्त्र' त्यांना प्रत्येक लढाईत उपयोगाचं ठरेल.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

*www.chiranjeevgodbole.com*